**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११०१८**
**मा.इ प्रभाग समिती**
**कार्यपत्रिका क्रमांक -३**
**सभावृत्तांत**

**दिनांक - ०१/०६/२०१८** **वेळ सकाळी ०२. ०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०१/०६/२०१८ रोजी दुपारी ०२.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा.श्रीम.भिमाबाई पोपट फुगे - **अध्यक्षा**
२) मा.श्रीम.बुर्डे सुवर्णा विकास
३) मा.तापकीर विनया प्रदिप (आबा)
४) मा.श्री.डोळस विकास हरिचंद्र
५) मा.श्री.उंडे लक्ष्मण धोंडू
६) मा.श्रीम.गायकवाड निर्मला मनोज
७) मा.श्री.सागर बाळासाहेब गवळी
८) मा.श्रीम.गोफणे अनुराधा देविदास
९) मा.श्रीम.बारसे प्रियांका प्रविण
१०) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे
११) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे
१२) मा.श्रीम.तापकीर साधना सचिन - स्विकृत सदस्य
१३) मा.श्री.लांडे विजय नामदेव - स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.श्री.नितीन कापडणीस - क्षेत्रीय अधिकारी, श्री.निकम एम.बी.लेखाधिकारी - श्री.जीवन गायकवाड-कार्यकारी अभियंता (स्थापत्य), श्री.पवार-कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), श्री.बी.पी.लांडे उपअभियंता (विद्युत).श्री.राजेंद्र शिंदे -उपअभियंता (स्थापत्य), श्री.बोरावके डी.एच.उपअभियंता (स्थापत्य),श्री.वहिकर एस.एस.-प्र. उपअभियंता (पाणीपुरवठा), श्री.डी.डी.गवळी –उपअभियंता, श्री.जाधव व्ही.के.-

उपअभियंता (स्थापत्य उद्यान), श्री.रोडे एस.के.- एमएसइबी- ए.इ., श्री.प्रभाकर तावरे - सहा.आरोग्य अधिकारी, श्री.गनबोटे ए.पी.क.अभियंता (स्थापत्य), श्री.ताकवले क.अभियंता (स्थापत्य.) श्रीम.वृषाली पोतदार क.अभियंता (स्थापत्य.), श्री.क्षीरसागर आर.व्ही.- क.अभियंता (स्थापत्य.), श्री. वाडकर एस.व्ही. - क.अभियंता (स्थापत्य), श्री.पवार वैभव –क.अभियंता (विद्युत), श्री.संदीप ठोकळ-क.अभियंता (ज.नि.), श्री.धडस ए.आर.-क.अभियंता (ज.नि.), श्री.निखील फेंडर- क.अभियंता (स्थापत्य उद्यान), श्री.म्हेत्रे एच.जे.- उद्यान सहाय्यक, श्री.डी.डी.सटाणे – (स्थापत्य उद्यान), श्री.मोरे बी.एस.- नावियो विभाग, श्री.डामसे आर.पी. – मलेरिया निरीक्षक, श्री.जाधव आर.डी-मुख्य लिपिक (झो.नि.पू), श्री.गायकवाड पी.आर. मुख्याध्यापक माध्य. विद्यालय, भोसरी, श्री.डोळस एन.एस.-लिपिक –माध्यमिक विद्यालय, भोसरी,

-------

**मा.अध्यक्षा** - सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

------

त्यानंतर खालीलप्रमाणे सूचना मांडण्यात आली.

**सुचक - मा.सागर गवळी** **अनुमोदक – मा.प्रा.सोनाली गव्हाणे**

कृषी राज्यमंत्री, मा.पांडूरंग फुंडकर यांचे दिनांक ३१/०५/२०१८ रोजी दु:खद निधन झालेने दोन मिनिटे सर्वांनी श्रध्दांजली वाहण्यात यावी.

**(सर्वांनी दोन मिनिटे उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात आली)**

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

--------

**मा.अध्यक्ष** - आजच्या सभेत दाखल झालेले ऐनवेळचे विषय दाखल करुन सदरची इ प्रभाग समितीची सभा सोमवार दि.०४/०६/२०१८ रोजी सकाळी ११.०० वा. पर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

-------

अध्यक्षा
इ प्रभाग समिती
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक - ३

**सभावृत्तांत**

**(दि. ०१/०६/२०१८ रोजीची तहकूब सभा)**

**दिनांक -०४/०६/२०१८** **वेळ सकाळी ११:०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची शुक्रवार दिनांक ०१/०६/२०१८ रोजीची दुपारी २.०० वा.ची तहकूब सभा सोमवार दि.०४/०६/२०१८ रोजी सकाळी ११.०० वा. इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा.श्रीम.भिमाबाई पोपट फुगे **-** **अध्यक्षा**
२) मा.श्री.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते
३) मा.श्री.डोळस विकास हरिचंद्र
४) मा.श्री.उंडे लक्ष्मण धोंडू
५) मा.श्रीम.गायकवाड निर्मला मनोज
६) मा.श्री.सागर बाळासाहेब गवळी
७) मा.श्रीम.बारसे प्रियांका प्रविण
८) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे
९) मा.श्री.बुर्डे अजित प्रताप - स्विकृत सदस्य
१०) मा.श्री.लांडे विजय नामदेव - स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.
मा.श्री.नितीन कापडणीस - क्षेत्रीय अधिकारी, श्री.अनिल थेऊरकर – प्र.प्रशासन अधिकारी, श्री.जीवन गायकवाड – कार्यकारी अभियंता (स्थापत्य), श्री.प्रविण घोडे – कार्यकारी अभियंता (विद्युत), श्री.पवार –कार्य.अभियंता (पाणीपुरवठा), श्री.बी.पी.लांडे उपअभियंता (विद्युत), श्रीम.शिनकर पी.बी.- उपअभियंता (स्थापत्य), श्री.दवंडे एस.के.- उपअभियंता (पाणीपुरवठा), श्री.जाधव व्ही.के. – उपअभियंता (स्थापत्य उद्यान), श्री.प्रभाकर तावरे - सहा.आरोग्य अधिकारी, श्री.गनबोटे ए.पी.- क.अभियंता (स्थापत्य), श्री.ताकवले क.अभियंता (स्थापत्य.), श्री.क्षीरसागर आर.व्ही. क.अभियंता (स्थापत्य.),

श्रीम.वृषाली पोतदार – क.अभियंता (स्थापत्य), श्री.कोतकर पी.बी. क.अभियंता (पाणीपुरवठा), श्री.बेळगांवकर सुनिल एस.- क.अभियंता (पाणीपुरवठा), श्री.राऊत व्ही.एस.- क.अभियंता (पाणीपुरवठा), श्री.निखील फेंडर- क.अभि यंता (स्थापत्य उद्यान), श्री.ए.व्ही.गुमास्ते- प्र.मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री, श्री.म्हेत्रे एच.जे.- उद्यान सहाय्यक, श्री.डी.डी.सटाणे - (स्थापत्य उद्यान), श्री.डामसे आर.पी. – मलेरिया निरीक्षक, श्री. गायकवाड पी.आर.मुख्याध्यापक माध्य. विद्यालय, भोसरी, श्री. फुगे एन.जे-प्र.क्रीडा पर्यवेक्षक.

------

**मा.अध्यक्षा** - सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

------

विषय क्रमांक १. प्रभाग क्र. ७ भोसरी येथील भोपते उद्यानाचे नांव बदलून धर्मवीर संभाजी उद्यान असे नामकरण करणेबाबत मा.भिमाबाई पोपट फुगे, सभापती यांचे दिनांक १/६/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक २ बोपखेल गावातील रस्त्यास कै.रघुनाथ गेनबा घुले पथ असे नामकरण करणेबाबत.मा.विकास हरिश्चंद्र डोळस यांचे दिनांक ०४/०६/१८ चे पत्र.

-------

अ) दिनांक **०३/०५/२०१८** रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका **२** ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

------

ठराव क्रमांक - **०६** विषय क्रमांक- १

दिनांक- - **०४/०६/**२०१८

सूचक- मा.सागर गवळी अनुमोदक – मा.प्रियांका बारसे

संदर्भ - च-होलीगावात दाभाडे वस्ती येथे असणा-या चौकास नामकरण पिं.चिं. म.न.पा.नुसार मान्यतामिळणेबाबत मा.लक्ष्मण सोपान सस्ते यांचे दि. १८/०५/२०१८ चे पत्र.

च-होली गावातील म्हसोबा मंदिराजवळ होणा-या चौकाला **श्रीमंत सुभेदार कृष्णाजी दाभाडे (सरकार)** चौक असे नामकरण करणेसाठी सदरच्या विषयास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

------

ठराव क्रमांक - **०७** विषय क्रमांक- २

दिनांक- - **०४/० ६/२०१८**

सूचक- मा. विकास डोळस अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ -दिघी-बोपखेल मधील दिघी येथील परांडेनगर परिसरांतील भागात दिशादर्शक बोर्ड बसविणेबाबत.मा.विकास हरिश्चंद्र डोळस यांचे दिनांक २१/०५/१८ चे पत्र.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये राहणा-या नागरीकांची सातत्याने वाढ होत आहे. तसेच प्रभाग क्र. ४ दिघी- बोपखल मधील दिघी गावातील नव नविन बांधकाम प्रकल्पामुळे तसेच नव्याने झालेले ६-/३० मीटर रस्त्यामुळे या उपनगरात येणा-या नागरीकांची सख्या दिवसेंदिवस वाढत आहे. दिघी मधील परांडेनगर हा परिसर मोठा असून तेथे अनेक रस्ते आहेत. त्या ठिकाणी लोकांच्या सोयी करीता प्रत्येक रस्त्यास दिशादर्शक बोर्ड बसविल्यास येणा-या नागरीकांना दळणवळणाच्या दृष्टीने सोयीचे होणार आहे.प्रभाग क्र.४ दिघी- बोपखैल मधील दिघीयेथील परांडेनगर परिसरातील भागात खालीलप्रमाणे दिशादर्शक बोर्ड बसविण्यात यावेत. १) दत्तगडनगर २) पंचशील कॉलनी ३) परांडेनगर बस थांबा ४) परांडेनगर कॉलनी नं. १ ५) जेष्ठ नागरीक, कै.सहादू (भाऊ) खंडू तुपे पथ ६)परांडेनगर,कै.बाप्पूसाहेब तुकाराम परांडे पथ ७) परांडेनगर कॉलनीक्र. २ कै. सुदाम तुळशीराम परांडेमार्ग ८) परांडेनगर कॉलनी नं.३ ९) परांडेनगर,कै.बाळासाहेब कोंडीबा परांडे पथ१०) परांडेनगर,कै.राघोबा कोंडीबा परांडे मार्ग ११) परांडेनगर, कै.तुळशीराम तुकाराम परांडे मार्ग १२) परांडेनगर, पसायदान,सुमनशिल्प फेज १ व २. सदरच्या विषयास मान्यता देणेत येत आहे. सदरचा ठराव कायम होणेची वाट न पाहता अंमलबजावणी स्थापत्य विभागाकडून करण्यात यावी.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**------**

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

**-------**

ठराव क्रमांक - ०८ विषय क्रमांक- १

दिनांक- - **०3/०५/**२०१८

सूचक- मा.संतोष लोंढे अनुमोदक – मा.विजय लांडे

संदर्भ - प्रभाग क्र. ७ भोसरी येथील भोपते उद्यानाचे नांव बदलून धर्मवीर संभाजी उद्यान असे नामकरण करणेबाबत मा.भिमाबाई पोपट फुगे, सभापती यांचे दिनांक १/६/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.७ भोसरी येथील शितलबाग परिसरातील उद्यानाला पुर्वी भोपते उद्यान असे नामकरण करण्यात आलेले आहे. तथापि स्थानिक नागरीकांच्या मागणीनुसार सदर उद्यानास “**धर्मवीर संभाजी उद्यान”** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**------**

ठराव क्रमांक - **०९** विषय क्रमांक- २

दिनांक- - **०३/०५/**२०१८ विभाग –

सूचक- मा.विकास डोळस अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ - बोपखेल गावातील रस्त्यास कै.रघुनाथ गेनबा घुले पथ असे नामकरण करणेबाबत.मा.विकास हरिश्चंद्र डोळस यांचे दिनांक ०४/०६/२०१८ चे पत्र.

बोपखेल गावातील कै.रघूनाथ गेनबा घुले स्थानिक नागरीकांनी त्यांचे कामाची आठवण व माहिती असावी म्हणून सर्व्हे नं.१५३/२/ब या रस्त्यास **"कै.रघूनाथ गेनबा घुले"** असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**------**

**मा. अध्यक्ष -** यानंतर मा.अध्यक्षा यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

अध्यक्षा
इ प्रभाग समिती
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी – ३९
क्र-इक्षेका/कावि/४/१४६/२०१८
दिनांक- **२७/०६/**२०१८.

प्रशासन अधिकारी तथा सचिव
इ क्षेत्रीय कार्यालय
भोसरी – ३९.

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**दिनांक ०४/०६/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे मासिक सभेत खालीलप्रमाणे मा.नगरसदस्यांनी चर्चा केली.**

**मा.प्रियांका बारसे-** आजच्या मिटींगमध्ये MSEB चे अधिकारी/कर्मचारी यांचेबरोबर मिटींग घेणार होतो.

**मा.क्षेत्रीय अधिकारी** - MSEB चे अधिकारी/कर्मचारी यांचेबरोबर स्वतंत्र मिटींग घेण्यात येईल.

**मा.प्रियांका बारसे-** पाणी, लाईट या गोष्टी किती महत्वाच्या आहेत. आम्हाला एक वर्षे झाले निवडून येऊन परंतू आमचे वॉर्डमधील कामे होत नसतील तर पुढच्या निवडणूकीवर परिणाम होऊ शकतो. पाण्याचे काय प्रॉब्लेम आहेत.

**मा.बेळगांवकर - क. अभियंता (पाणीपुरवठा)-** पंपावरची लाईट गेली होती. लाईटचा प्रॉब्लेम आहे.

**मा.प्रियांका बारसे –** खूप गंभीरतेने समस्येबाबत विषय घेणे गरजेचे आहे. नागरीकांना नगरसेवकांना फेस करावे लागते. इ प्रभागात इतर प्रभागापेक्षा जास्त तक्रारी आहेत.

**मा.बेळगांवकर क. अभियंता (पाणीपुरवठा) –** लाईनचा प्रॉब्लेम झाला आहे.

**मा.पवार- कार्य.अभियंता (पाणीपुरवठा)-** लाईट गेल्यामूळे पाणीपुरवठा करणेबाबत प्रॉब्लेम झालेला आहे. कालपासून लाईटचा प्रॉब्लेम कमी झालेला आहे. मी स्वता: चेक करुन घेतो.

**मा.प्रियांका बारसे –** एक ना अनेक उत्तरे आपण देता असता. परंतू पाण्याचा खूप प्रॉब्लेम आहे.

**मा.पवार - कार्य.अभियंता (पाणीपुरवठा)-** एमआयडीसी मध्ये दोन वेळा लाईट बंद होती. यापुढे पाणी आले की, पाण्याचे व्यवस्थित वाटप करणार आहे.

**मा.भिमाबाई फुगे,सभापती –** पहिले नगरसेवक होते त्यावेळी पाणीपुरवठा व्यवस्थित होता. आता पाणीपुरवठा का व्यवस्थित होत नाही.

**मा.प्रियांका बारसे –** आम्हाला २४ तास पाणी नको. फक्त दोन तासच पाणी पाहिजे. सकाळी पाणी कोणाला मिळते, दुपारी कोणाला व्यवस्थित मिळत नाही. पाणी वाटपाबाबत व्यवस्थित नियोजन करावे.

**मा.निर्मला गायकवाड –** दिघीमध्ये एक महिन्यापासून पाणी व्यवस्थित मिळत नाही. दिघी मध्ये लोकसंख्या वाढली आहे. नागरीकांना पाणी पुरेसे मिळत नाही.

**मा.विकास डोळस –** पाणी लाईट बाबत बंडल आहे असे सर्व म्हणतात. नेहमीच टँकर मागवावे लागतात. पाणी नाही ही परिस्थिती हास्यास्पद व चिड आणणारी आहे. रात्री सुध्दा स्थानिक नागरीकांचे पाण्याबाबत फोन येतात. अधिकारी फक्त उत्तरे देण्यासाठी तयार आहे.

**मा.क्षेत्रीय अधिकारी –** सध्या पावसाळयाचे दिवस आहेत. आपत्कालीन परिस्थिती कधीही उद्भ्वू शकते. त्यामुळे या काळात कुणाचेही फोन बंद ठेवायचे नाही.

**मा.विकास डोळस –** प्रत्येक अधिकारी/कर्मचारी जे कामकाजात टाळाटाळ करकता त्यांना सक्त ताकिद दया. त्यांचेवर कारवाई करा. आता पर्यंत दिघीमध्ये पाण्याचा प्रॉब्लेम आहे. याबाबत कायमस्वरुपी  सोल्युशन काढले पाहिजे. आपण इंजिनिअर सारखेच काम केले पाहिजे. प्रत्येक गोष्ट नगरसेवकांकडून झाली पाहिजे का? आता  निवडणूक होणार आहे. त्यावेळी पालिकेतील लोकांनी कामच केले नाही असे होईल. गजानन महाराज मंदीर येथे गणेशनगर इ प्रभागाच्या अंतर्गत आहे हे सुध्दा कर्मचा-यांना माहित नाही. त्यामुळे पाणीपुरवठा विभागातील लोकांवर कारवाई केली पाहिजे. पुढचे परिणाम काय होतील ते त्यांना दाखवा.

**मा.लक्ष्मण उंडे –** 24x7 प्रकल्पाचे काम झाले पाहिजे. मागचे मिटींगला याबत बोलणे झाले होते. दत्तनगर मध्ये डांबरीकरण का केले नाही? गुडघ्याएवढे खड्डे झाले आहेत. राडारोडा रस्त्याच्या साईडला गोळा करुन ठेवला आहे. तो उचलण्यात यावा. ड्रेनेजलाईन का टाकत नाही. रोज पेपरला बातम्या येत असतात. प्रत्येक वेळी टँकर बोलवायचे हे बरोबर नाही. टँकर हे सोल्युशन नाही. त्यासाठी योग्य ती उपाययोजना केली पाहिजे.

**श्री.पवार-  कार्य.अभियंता (पाणीपुरवठा)-** लडकत साहेब यांचेबरोबर बोलणे झाले आहे. आम्ही  साईट व्हीजीट करणार आहोत.

**मा.लक्ष्मण उंडे –** खड्डा बुजवून लेवल करण्यासाठी परमिशन आहे का? पोलीस चौकी ते ममतानगर चौक पर्यंत खड्डे झाले आहेत.

**मा.क्षेत्रीय अधिकारी –** परमिशन घ्यावी लागते. परमिशन दिली असेल तरच पोलीस डिपार्टमेंटला कॉपी बजवावी लागते.

**मा.लक्ष्मण उंडे –** अतिक्रमण बाबत काय चालले आहे?

**मा.क्षेत्रीय अधिकारी –** अतिक्रमण बाबत आपलेकडून सगळी यंत्रणा काढून घेतली आहे. सध्या मुख्य कार्यालयातील अतिक्रमण विभागाकडे हे कामकाज आहे.

**मा.सागर गवळी –** संतनगरला लाईन क्रॉस करायची आहे ती लाईन क्रॉस झाल्यानंतर प्र.क्र.५ उत्तरेकडील ३०% भाग पाण्याचा आहे. दोन तास हनुमान कॉलनीत पाणीपुरवठा होतो. पाण्याच्या वेळेबाबत निष्काळजीपणा आहे. लोकांचा विश्वास उडाला आहे. आता लोकांची अडचण आहे. रोज पाण्याचा प्रॉब्लेम आहे. अक्षयनगर भाग हा च-होलीमध्ये येतो. त्याठिकाणी पाण्याचा अतिशय प्रॉब्लेम आहे. मी तेथे तीन तास बसलो होतो.  त्यावेळी मा.आमदार साहेब यांना पाण्याबाबत फोन येत असेल तर किती भयानक गोष्ट आहे. एक वर्षात एक पाईपलाईन टाकू शकत नाही. सहकारनगरमधील नागरीक गटाराचे मिक्स असलेले पाणी पितात. त्यांना नवीन कनेक्शन देत नाही.  देवकर वस्तीत स्वच्छ पाणी भेटल्याचा आनंद नागरीकांनी पेढे वाटून व्यक्त केला. दिड वर्षापासून पाण्याचे हाल होत आहेत. रिकनेक्शन करा.

**श्री.पवार- कार्य.अभियंता (पाणीपुरवठा)** - २४ तासामधून दोन दोन तास पाण्याचे वाटप करण्यात येईल. पाणीपुरवठा करणेबाबत व्यवस्थित नियोजन केले जोईल. रिकनेक्शन करण्यात येईल. वर्क ऑर्डर आले की एक महिन्यात कामे करण्यात येईल.

**मा.प्रियांका बारसे –** आम्ही नागरीकांचे फोन घेतो. नागरीकांच्या समस्या समजून घेतो. एक वर्षापासून हे ऐकत आहोत. सध्या नूर मोहल्यामध्ये तीन दिवसापासून पाणी नाही. रोजे चालू आहेत. नूर मोहल्यामध्ये पाणी दिले पाहिजे. जे कामच करीत नाही त्यांचेवर कठोर कारवाई झाल्याशिवाय पर्याय नाही.

**मा.सागर गवळी** – पावसाळा आला की खोदाई करु शकत नाही. जी कामे लवकरात लवकर करता येईल ती कामे करणे. टेक्नीकल अडचणी आपल्याला माहित नाही. नागरीकांनाही माहित नसते. भविष्यकाळात जे काम करणार आहे ते काम आताच प्रॉपर करणे. ५,१० वर्षे कामाची अडचण नसली पाहिजे. राधानगर, सॅण्डवीक कॉलनी या भागाचे सांडपाण्याचे काय केले? मा.आमदार साहेब यांचेपर्यंत नागरीक गेले नाही पाहिजे. नागरीकांनी आमचेकडे आले पाहिजे. आमचेकडून चुकीचे काही घडले तर सर्वस्वी जबाबदारी आमची राहील.

**मा.प्रियांका बारसे –** पाण्याचा कॉक चालू करणारे लोकांवी पाण्याची स्थिती अवलंबून असते. कंप्लेट केल्यावरच का पाणी येते? अगोदर का पाणी येत नाही. क्षेत्रीय अधिकारी यांची Visit होणार असेल तरच पाणी येते.

**मा.सागर गवळी** – किती आ-या सोडल्या की पाणी येते हे वॉलमनचे काम आहे. एक वर्षे होऊनही एकही काम झालेले नाही.

**मा.लक्ष्मण उंडे** – नागरीकांना पाणी देऊ या मुद्दयावर आम्ही निवडून आलो आहे. काही ठिकाणी पाणी सोडल्यावर एक तासाने पाणी येते. त्यामुळे तेथील नागरीकांना थोडा वेळच पाणी मिळते. त्यांना आ-या किती सोडल्या हे सुध्दा माहित नसते. वॉलमनने या सगळया गोष्टीकडे लक्ष दिले पाहिजे.

**मा.सागर गवळी** – कचरागाडीचे कर्मचारी सर्व भागातील दोनदोन दिवस कचरा उचलत नाही. तसेच कच-याच्या गाडीवी काम करणारे कर्मचारी चुकीची भाषा करतात. कच-याच्या गाडयांची अवस्था बेकार झाली आहे. साफसफाई करणारे कर्मचारी गल्लीमध्ये साफसफाई करीत नाही. ठेकेदारांची मिटींग घेण्यात यावी.

**श्री.प्रभाकर तावरे –सहा.आरोग्याधिकारी** – ठेकेदारांची मिटींग लावतो.

**मा.प्रियांका बारसे** – ठेकादारांकडील कर्मचा-यांना पी.एफ.मिळत नाही.

**श्री.प्रभाकर तावरे –सहा.आरोग्याधिकारी –** पी.एफ.सर्वांना दिल्या शिवाय पगार होत नाही. पगार कमी असेल तर पी.एफ. दिला जात नाही.

**मा.सागर गवळी** – सखुबाई गवळी उद्यानमधील साफसफाई होत नाही. टॉयलेटची स्वच्छता होत नाही. तसेच तेथे जो वॉचमन आहे त्याला बोलायला येत नाही. त्यामुळे चांगला वॉचमन

ठेवा. प्रभागातील सर्व नागरीक त्या ठिकाणी येत असतात. कडक सिक्युरीटी ठेवा. गार्डनमध्ये चांगली झाडे लावा. लॉन तयार करा. तेथील सर्व जागा साफ करुन घ्या.

**श्री.सटाणे – (उद्यान)** – साफसफाई करण्यात येईल. कच-याचे कंपोस्ट खत तयार करीत आहे.

**मा.प्रियांका बारसे –** गुळवे मैदान येथे वॉकिंग ट्रॅकवर झाडे लावली ती झाडे वॉकिंग ट्रॅकच्या खाली लावणेत यावी.

**श्री.सटाणे (उद्यान)** – वॉकिंग ट्रॅकवरील झाडे खाली लावण्यात येतील.

**मा.भिमाबाई फुगे, सभापती –** सगळीकडे डांबरीकरण केले नेमके माझे वॉर्डमध्ये डांबरीकरण केले नाही.

**मा.विकास डोळस –** पावसाळयापुर्वी ड्रेनेजचे काम करण्यात यावे.

**मा.सागर गवळी –** या वर्षात जी कामे करायची आहेत त्याचे इस्टीमेंट तयार करणे. ५० टक्के काम झाले आहे. बाकी कामे लवकर करणे.

**मा.अजित बुर्डे (स्विकृत सदस्य)-** पावसाळयामध्ये पेव्हींग ब्लॉकचा प्रॉब्लेम आहे. नादुरुस्त झालेमुळे खड्डे पडले आहे. पेव्हींग ब्लॉक दुरुस्त करणेचे काम करणे. अधिका-यांना विनंती आहे की, नगरसेवकांची कामे पुर्ण झाली पाहिजे. मा.आमदारांना या महापालिकेत यावे लागते ही शोकांतिका आहे. रस्त्यावरील दिवे इतके खराब झाले आहेत की, त्यांचेवर धूळ असल्यामुळे दिव्यांचा प्रकाश पडत नाही. त्यामुळे काचा साफ करण्यात याव्यात.

**मा.क्षेत्रीय अधिकारी** - पेव्हींग ब्लॉकचा विषय काय आहे?

**मा.जीवन गायकवाड -कार्यकारी अभियंता (स्थापत्य)-** पेव्हींग ब्लॉक खड्डे दुरुस्त करणारे आहे. त्याबाबतचे टेंडर पाठविणार आहे.

**मा.प्रा.सोनाली गव्हाणे** – आदीनाथनगर येथे कचरा साफ केला जात नाही. त्या ठिकाणी डेंग्युचा पेशंट आढळला आहे. औषध फवारणी केली पाहिजे.

**श्री.डामसे –मलेरिया निरीक्षक** – गोडाऊनला औषध आलेले आहे. त्यामुळे सर्व वॉर्डमध्ये औषध फवारणी केली जाईल.

**मा.प्रा.सोनाली गव्हाणे-** आदीनाथनगर येथील गार्डनमध्ये वॉचमन नाही. तेथे सर्व मोठी मुले असतात.

**श्री.सटाणे –(उद्यान) -** आदीनाथनगर येथील गार्डनमध्ये वॉचमन ठेवण्यात येईल.

**मा.विजय लांडे (स्विकृत सदस्य) –** सीएमइ येथील नाला पूर्ण भरला आहे. पावसाळा सुरु झाल्यापासून सोसायटीमध्ये गुडघ्याएवढे पाणी साचले आहे. पावसाळयापुर्वी नालेसफाई करुन देण्यात यावी. सीएमईच्या नाल्याबाबत कायम स्वरुपी निर्णय घेण्यात यावा.

**मा.प्रभाकर तावरे – सहा आरोग्याधिकारी –** सीएमई नाला आहे त्याठिकाणी दोन,तीन नाले जोडलेले आहे. तसेच तेथे केबल गेलेली आहे. जे.इ.सोबत बोलणे झाले आहे. जे.सी.बी.मशीन लावता येत नाही. ५,६ फूट पाणी लागते. त्यात ड्रेनेजचे पाणी येते.

**मा.विकास डोळस –** सोसायटीमधून साठलेले पाणी जाण्यासाठी आऊटलेट दिलेला नाही. चार सोसायटीचे पाणी साठले आहे. नाल्याचे शेजारी लोकांची घरे आहेत.

**मा.प्रभाकर तावरे – सहा आरोग्याधिकारी –** मी प्रत्यक्ष पाहणी करतो.

**मा.भिमाबाई फुगे, सभापती –** समर्थकॉलनी, गिताईनगर मधील कामे वर्ष झाले तरी अजून झालेले नाही.

**मा.सागर गवळी –** सगळीकडील ड्रेनेजची साफसफाई करुन घ्यावी. पावसाळयाच्या आत औषध फवारणी करणे. धूरफवारणी करणे.

**मा.प्रा.सोनाली गव्हाणे –** भांबुर्डेनगर येथील कचराकुंडीत येथे हॉटेल लाईनवाले व सगळीकडील लोक कचरा टाकतात. त्यामूळे तेथील कचराकुंडी काढून दुसरीकडे हलविण्यात यावी. सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात यावे. येणारे-जाणारे व्यक्तींना त्रास होत आहे. वाहने रस्त्यावर स्लीप होतात. तसेच पीएमटी डेपोजवळ काही अंतरावर टेम्पो सुध्दा लावलेले असतात.

**मा.श्री.लांडे उपअभियंता (विद्युत) –** सीसीटीव्ही कॅमेरे स्मार्ट सिटी प्रोजेक्टमध्ये करणार आहे.

**मा. प्रियांका बारसे-** बराच वेळ सगळे सन्मा नगरसदस्य लाईट, पाणी, रस्ते, ड्रेनेज व आरोग्य विभागाशी संबंधीत चर्चा करीत आहोत. चारही प्रभागाचे नगरसेवक सर्व विषयावर बोलत आहेत. तोंडी भरपूर बोलून झाले, आता आम्ही मा.क्षेत्रीय अधिकारी व मा.आयुक्त यांचेकडे लेखी तक्रार करणार आहे.

**मा.विकास डोळस –** याबाबत सहमत आहे.

**मा.भिमाबाई फुगे, सभापती –** आजच्या मिटींगला उपस्थित राहिलेल्या सर्वांचे आभार मानते. व सभा संपल्याचे जाहीर केले.